The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# 'संत मुक्ताबाई यांच्या कवितेतील भक्तीविचार'

**प्रा. महारूद्र जगताप,**
मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रास्ताविक :**

'भक्ती' हा शब्द 'भजसेवायाम' या धातुपासून निर्माण झालेला आहे. भक्ती म्हणजे सेवा, भक्ती म्हणजे प्रेम होय. माणसाच्या वैयक्तिक श्रद्धेतून 'भक्ती' अस्तित्वात आल्याचे दिसून येते. बाह्य कर्मकांड, यज्ञमार्ग व शास्त्राने सांगितलेले विधी कमी होऊन भक्तीचा संबंध परमेश्वर भक्तीशी प्रस्थापित करण्याकडे लोकांचे मन आकर्षित झाले. मोक्ष प्राप्तीचा अधिकार सर्वांना आहे या धारणेतून भक्ती संप्रदाय विकसित झाला. वेद उपनिषदातून भक्ती मार्गाला चालना मिळाली. उपनिषदातील भक्ती योगाला भगवतगीतेत शास्त्रीय आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले. श्रीकृष्णाने भगवतगीतेतून सांगितलेल्या विविध मार्गांपैकी भक्तीमार्ग हा सामान्यांसाठीचा साधा, सोपा, सुलभ असा साधनमार्ग होय. हा 'भक्तियोग' साधनमार्ग श्रीकृष्णाने भगवतगीतेच्या सहाव्या अध्यायात सांगितलेला आहे.

मानवी जीवनात भक्तीचे स्थान अनादी असून भक्तीभावनेतूनच विविध संप्रदाय उदयास झाले यामध्ये महाराष्ट्रातील नाथ, वारकरी, महानुभाव, दत्त व समर्थ या पाच संप्रदयांचा नामोल्लेख करणे महत्वाचे ठरते. या विविध संप्रदायांपैकी 'वारकरी संप्रदाय' हा एक प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखला जातो. या वारकरी संप्रदायालाच 'भागवत संप्रदाय' म्हणून संबोधले जाते. भगवंताला सर्वस्व अर्पण करणारा तो भागवत असे म्हटले जाते. भक्तांचा भक्तीप्रधान पंथ म्हणून या पंथाकडे पाहिले जाते. या पंथाचे उपास्य दैवत पंढरपूरचा 'पांडुरंग' हा असून याचे अनुयायी आषाढी, कार्तिकीच्या वारीला नित्यनेमाने जातात. 'वारीकर' या शब्दावरून 'वारकरी' हा शब्द रूढ झाला आहे. वारकरी म्हणजे पंढरपूरची वारी करणारा असा अर्थ घेतला जातो. पांडुरंगाच्या चरणी जीवन व्यतीत करणारा वृत्त आचरणारा तो वारकरी होय, 'वारकरी' शब्दावरून संप्रदायाचे नाव वारकरी संप्रदाय पडल्याचे दिसून येते. या संप्रदायातील भगवत भक्तांना संत, साधू, वैष्णव, भक्त, दास, वारकरी, माळकरी अशा अनेक नावाने ओळखले जाते. 'भागवत संप्रदायाची' परंपरा अखंडपणे जोपासण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत गोरोबा कुंभार, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्यासह संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहेणाबाई, संत वेणाबाई यासह अनेक संतांनीही केले आहे. या सांप्रदायिक संतानी विपूल प्रमाणात वाङ्मय निर्मिती करून भक्तीला अनन्य साधारण महत्व प्राप्त करून दिले आहे. भागवत सांप्रदायिक भक्तीमार्गाचा पाया रचनारे आद्य संत म्हणून संत ज्ञानेश्वरांचा नामोल्लेख केला जातो. संत ज्ञानेश्वर यांची धाकटी बहीण संत मुक्ताबाई होय. या संतमुक्ताबाई यांच्या कवितेतील भक्ती विचार प्रस्तुत शोधनिबंधातून केला जाणार आहे.

**संत मुक्ताबाई यांच्या कवितेतील भक्ती विचार :**

संत मुक्ताबाईंचा जन्म शके 1201 मध्ये श्री क्षेत्र पैठण जवळील गोदावरीच्या तीरावर असलेल्या आपेगाव येथे झाला. त्याचे आई वडिल रूक्मिणीबाई व विठ्ठलपंत होय. आई वडिलांनी देहत्याग केला. त्यावेळी मुक्ताबाई ही चार वर्षांची होती. संत ज्ञानेश्वरादी भावंडामध्ये अवघे अठरा

वर्षाचे आयुष्य लाभलेल्या संत मुक्ताबाईंचा पारमार्थिक, अध्यात्मिक क्षेत्रातील अधिकार फार मोठा आहे. संत ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताई यांना वडिलबंधू निवृत्तीनाथांकडून गुरूदीक्षा मिळाली. निवृत्तीनाथांनी दिलेल्या साधनमार्गाने मुक्ताईचा जीवन प्रवास झाला. संन्याशाची मुले म्हणून अपमानीत जीवन त्यांच्या वाटेला आले. समाजातील अपमानीत जीवनाच्या दाहकतेत होरपळल्यामुळे त्यांना परमेश्वराची ओढ लागली. त्यांच्या वाट्याला उपेक्षीत जीवन आल्यामुळे परमेश्वराच्या प्रगाढ भक्तीतून आणि नि:स्सीम वैराग्यातून त्यांचे भक्तीकाव्य उदयास आले. परमेश्वराच्या भक्तीतून, पारमार्थिक वृत्तीतून व आत्मानुभूतीतून त्यांची भावकविता प्रकट झाली आहे. त्यांच्या अंत:करणातली हृदयाच्या पीळातून निर्माण झालेली ही अत्युत्कठ भक्तीवाणी आहे. संतसकलगाथेत मुक्ताबाईंच्या नावावर 42 अभंग आहेत. त्याचबरोबर त्यांचे हरिपाठाचे 12, सद्गुरू माहात्म्यपर 06, उपदेशपर 22, उच्च ज्ञानावस्था सांगणारे 02 अभंग आहेत. संत मुक्ताबाईंची काव्यसंपदा भक्तीतून प्रेरीत असली तरी तिच्यातील परखडपणा हा योग मार्गाचा प्रभाव दर्शक आहे. संत मुक्ताबाई हया एक योगिनी असून त्यांच्या योगमार्गाचा स्थायीभाव भक्ती हा आहे. त्यांचे भक्तीकाव्य म्हणजे मराठी काव्यशारदेच्या मंदिरातील अमौलीक लेणं होय.

संत मुक्ताबाई यांनी नवविद्याभक्तीप्रकारातील 'स्मरणभक्ती' या भक्तीप्रकाराचा आपल्या कवितेतून आविष्कार घडवला आहे. सगुन, निर्गुन परमेश्वराच्या स्मरणाने प्रेमभाव जागृत होत असतो. तो प्रेम भाव परमेश्वराचे नाम, गुण, लिला, कथा, अवतार, चरित्र्ये इत्यादींचे चिंतन करणे, मनन करणे म्हणजेच परमेश्वराची स्मरण भक्ती होय. परमेश्वराच्या स्मरण भक्ती विषयी संत मुक्ताबाई म्हणतात."

"मुक्त जावे सदा होती पै नामपाठे। तोचि रूप विटे देखिले आम्ही।।1।।
पुंडलिके विठ्ठल आणिला पंढरी। आणूनी लवकरी तारिले जग।।2।।
ऐसे पुण्य केले एका पुंडलिकेची। निरसली जनाची भ्रमभूली ।।3।।
मुक्ताई चिंतने मुक्त पै झाली। चरणी समरसली हरिपाठे।।4।।"

(श्री सकलसंतवाणी अभंग-1)

पंढरपूरच्या पांडुरंगाचे नामस्मरण करताना जीव कायमचा मुक्त होतो. त्याचे रूप आम्ही पाहिले. भक्त पुंडलिकाने स्वत:च्या भक्ती सामर्थ्यावर विठ्ठलाला पंढरपूरला आणले. असा भक्तीभाव येथे मुक्ताबाई प्रकट करताना दिसून येतात. संसार, प्रपंचात गुरफटलेली व्यक्ती परमेश्वराच्या नामस्मरणाने अलिप्त होऊ शकते. भक्तीने वैकुंठाप्रत जाण्याचा मार्ग सापडतो. परमेश्वराच्या नामस्मरण भक्तीविषयी मुक्ताबाईला दृढ श्रद्धा आहे. काया, वाचा, मनाने परमेश्वराचे नाम स्मरण, भजन करणे ही स्थायी भक्ती आहे. परमेश्वराचे नामस्मरण हा भक्तीतला राजमार्ग आहे. संसाररूपी सागरातून तरूण जाण्यासाठी हरिणाम समर्थ असल्याचे मुक्ताबाई सांगतांना दिसून येतो.

संत मुक्ताबाई यांच्या कवितेतून अर्चनभक्तीचा प्रत्यय येतो. परमेश्वर, देव, देवता, संत महात्म्ये यांची मनो भावे, पूजाअर्चा करावी असे सामान्यपणे सांगीतले जाते. पूजाअर्चा ही नवविद्या भक्ती प्रकारातील पाचवी भक्ती होय. अर्चनाभक्तीमध्ये परमेश्वराचे, मूर्तीचे, प्रतिमेचे, एकाग्रपणे,

विनम्रतेने, तन्मयतेने, मनोभावे, श्रद्धेने केलेले पूजन अर्चन असते. अर्चन भक्ती विषयी संत मुक्ताबाई म्हणतात,

"पूजा पूज्यविते पूजक पै चित्ते।
घाली दंडवते भावशीला ।।1।।
चंपक सुमने पूजा कातळीने।
धूप दिप मने मानसिक ।।2।।
भावातील भावो वोगटी अरावो।
पाहुणा पंढरीरावो हरि माझा ।।3।।
मुक्ताई संपन्न विस्तारूनि अन्न।
सेवी नारायण हरि माझा ।।4।।"

(श्रीसकलसंतवाणी अभंग - 14)

संत मुक्ताबाईंची काव्यरचना भगवतभक्त प्रेरित, स्वयंस्फूर्त आत्मिकवाणीतून स्फूरलेली असल्याचे जाणवते. यामध्ये स्त्रीसुलभभाव भक्तीतून व्यक्त झालेला आहे. याचा प्रत्यय त्यांच्या ताटीचे अभंग मधून येताना दिसून येतो.

संत मुक्ताबाईंनी नवविद्याभक्तीतील नामस्मरण भक्तीला अत्युच्च स्थान दिलेले आहे. असे असले तरी त्यांच्या अभंगातून पादसेवन, श्रवण, अर्चन भक्तीचा उल्लेख आल्याचे दिसून येते. मात्र तो अपवादात्मक असल्याचे जानवले. संत मुक्ताबाईंचे काव्य भक्तीतून प्रेरीत असून ते उत्स्फुर्त व उत्कठभावातून स्फूरलेले आहे. त्यांच्या काव्यात परमार्थाची ओढ, परमेश्वर भेटीचा ध्यास, भक्तीमार्ग, योगमार्ग, उपेक्षित जीवन, स्वकर्माची जाणीव, परमार्थ, सदाचार, वैराग्य, अद्वैतता, सांप्रदायिकता, स्वजीवनाभूभूती, तत्वावरील दृढ निष्ठा इत्यादी गोष्टी दिसून येतात. त्यांनी त्यांच्या काव्यातून भक्तीचा स्वीकार करून पारमार्थिकांनाही तोच मार्ग सांगितल्याचे जाणवत राहते. थोडक्यात संत मुक्ताबाईंची अभंग रचना पंढरीमात्म्य, पांडुरंगमहती, नामस्मरण, सदगुरूकृपा, स्वानुभूतीदर्शन, साधना, उपदेश अशा अनेकविध विषयान्वये, आशयान्वये साकारलेली दिसून येते. संत मुक्ताबाईंचे वर्णन करताना संत नामदेव म्हणतात,

"लहानशी मुक्ताबाई जैशी सणकांडी।
केले देशोधडी महान संत।।"

संत मुक्ताबाई या नावाप्रमाणेच सर्वमुक्त होत्या. त्यांचे भक्तीकाव्य सर्वव्यापी मुक्तीचे काव्य आहे. त्यांच्या काव्यात सर्वत्र मुक्तीचा जयघोष आपल्याला पाहावयास मिळतो. ही मुक्ती जशी संसारमुक्ती होती तशीच जीवनमुक्ती होती आणि विशेष म्हणजे ही देहमुक्ती होती. त्यांच्या या मुक्तीत त्यांच्या भक्तीचा आणि आध्यात्मिक साधनेचा फार मोठा वाटा आहे. त्याची कविता ही श्रेष्ठ तत्वकविता आहे.

**समारोप :**

मानवी जीवनात भक्तीचे स्थान अनादी असून भक्तीभावनेतूनच विविध संप्रदाय उदयास आले. महाराष्ट्रातील नाथ, वारकरी, महानुभाव, दत्त व समर्थ संप्रदाय महत्वाचे असून या संप्रदायातील

वारकरी संप्रदाय हा एक महत्वाचा संप्रदाय आहे. या संप्रदायातील संत कवयित्रींनी भक्तीकाव्याची निर्मिती करून मराठी वाङ्मयाला समृद्ध केले आहे. संत कवयित्रींमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झालेल्या संत मुक्ताबाईंनी अभंगरचनेतून 'नामस्मरण' भक्तीला अनन्य साधारण महत्व देऊन एक प्रकारे भक्तीवाङ्मयालाच अधोरखीत केले आहे. तसेच संत मुक्ताबाईंच्या कवितेतील भक्ती सगुणात रममान न होता निर्गुन स्वरूपात रममान होताना दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

1) 'वारकरी संत कवयित्री' - संजीव पगारे

2) 'संत कविता एक दृष्टिकोन' - प्रकाश देशपांडे केजकर

3) 'वारकरी संतांचा भक्तीयोग' - शंकर अभ्यंकर

4) 'संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध' - सुहासिनी इर्लेकर